माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ४१४८ / २०२३ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| किसन साळू मसळे | ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत पाटण, ता.आंबेगाव, जि.पुणे | विस्तार अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव (घोडेगाव) ता.आंबेगाव, जि.पुणे |

## ( सुनावणी दिनांक - १८/०६ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.१२.०७.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.०३.०३.२०२३ च्या माहिती अर्जात सन २०१९ ते अजातागायत पेसा निधीच्या खर्चाची सर्व माहिती तसेच १५ वा वित्त आयोगाच्या निधीच्या खर्चाची माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, “माहिती दिली नाही.”

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, “अपिलार्थीला दि.०९.०६.२०२३ च्या पत्राने उत्तर दिले आहे. अपिलार्थी यांनी ५ वर्षाची माहिती मागितलेली आहे त्यांना कोणत्याही एका वर्षाची माहिती देणेत येईल.”

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, "जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीला दि.०९.०६.२०२३ च्या पत्राने उत्तर दिले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असलेने , आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे."

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत पाटण, ता.आंबेगाव, जि.पुणे यांनी आयोग आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत एक दिवस निश्चित करून अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेले अभिलेख अवलोकनास्तव उपलब्ध करून द्यावेत. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली २५ पृष्ठये माहिती अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामुल्य पुरवावी. अपिलार्थी यांना २५ पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास शुल्क आकारुन पुरवावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव (घोडेगाव) ता.आंबेगाव, जि.पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ४१४८ / २०२३ / पुणे 9126/2025 दिनांक - 3/9/2025